# धर्मांतराच्या डावपेचांपासून सावधान !

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


| | |
|---|---|
| १. ख्रिस्ती आणि मुसलमान यांचे हिंदूंचे धर्मांतर करण्यामागील हेतू | ६ |
| २. हिंदूंच्या ख्रिस्तीकरणासाठी वापरले जाणारे डावपेच | ८ |
| * प्रलोभने दाखवणे * ख्रिस्त्यांचे कथित सेवाकार्य | ११ |
| * अज्ञ हिंदूंची फसवणूक * हिंदु धर्मियांप्रमाणे आचरण करणे | २० |
| * हिंदु धर्मावर टीका करणे * बळाचा वापर करणे | २८ |
| ३. हिंदूंच्या इस्लामीकरणासाठी वापरले जाणारे डावपेच | ३४ |
| * बुद्धीभेद करणे * वशीकरण करणे | ३५ |
| * बळाचा वापर, अपहरण आणि आतंकवाद्यांचे साहाय्य | ३९ |
| ४. धर्मांतराच्या संकटाचा अभ्यासपूर्ण प्रतिकार करा ! | ४० |
| * बुद्धीभेद करणाऱ्या ख्रिस्त्यांना सडेतोड प्रत्युत्तर द्या ! | ४० |
| * हिंदूंचे धर्मांतर घडवणाऱ्यांना प्रश्न विचारा ! | ४२ |
| ५. हिंदूंचे धर्मांतर करणाऱ्या अहिंदूंना वैध मार्गाने रोखा ! | ४३ |
| ६. हिंदु समाजाला आवाहन | ४३ |
| ७. हिंदूंनो, अद्वितीय हिंदु धर्माचे प्रचारक बना ! | ४५ |
| ८. हिंदु राष्ट्रात अहिंदूंना धर्मप्रसार करण्यास बंदी असेल ! | ४७ |

# मनोगत

गेल्या काही शतकांपासून अहिंदूंनी त्यांची लोकसंख्या वाढावी, **या** महत्त्वाकांक्षेपोटी अनेकविध मार्गांनी हिंदूंचे धर्मांतर केले. छळ, बळ, कपट यांपासून आमिषे, फसवणूक यांपर्यंत वेगवेगळे घटनाविरोधी मार्ग त्यांनी अवलंबले. त्यात वैचारिक मंथन कुठेही नव्हते. 'येशू ख्रिस्त आणि त्याचा पंथ मनापासून पटला, म्हणून ख्रिस्ती झालेले लोक जवळजवळ नाहीत', असे अनेक मिशनऱ्यांनीच लिहून ठेवले आहे. आजही अहिंदूंकडून हिंदूंचे धर्मांतर मोठ्या प्रमाणावर चालू आहे. धर्मांध मुसलमान आतंकवादाद्वारे हिंदु धर्मावर सरळ आक्रमण करतात, तर ख्रिस्ती मिशनरी पूतनामावशीसारखे लपूनछपून आक्रमण करतात. धर्मांतर झालेली व्यक्ती तिच्या समाजाच्या सहदाोि वर्षांच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि ऐतिहासिक परंपरांपासून एका क्षणात दूर जाते. हे लक्षात घेऊन हिंदु धर्म आणि हिंदुस्थान जिवंत रहावे, यासाठी अहिंदूंकडून अवलंबल्या जाणाऱ्या धर्मांतराच्या विविध डावपेचांची सविस्तर माहिती या ग्रंथात देण्यात आली आहे. त्याचसह 'धर्मांतर रोखायचे कसे, धर्मांतराच्या विरोधात हिंदूंनी वैधरित्या (सनदशीररित्या) कोणती भूमिका घ्यावी आणि काय कृती करावी', यांचे विवेचनही ग्रंथात केले आहे. पाश्चात्त्य राष्ट्रांतील ख्रिस्ती त्यांच्या पंथाचा त्याग करत आहेत; पण त्यांच्यासमोर दुसरा पर्याय नसल्यामुळे त्यांचे जीवन सैरभैर होऊन ते मायेत गुंतलेले आहेत. दुसरीकडे अरब राष्ट्रांतील मुसलमान एकमेकांच्या जिवावर उठले आहेत. त्यामुळे त्यांचे जीवन असुरक्षितता आणि आक्रमकता यांनी भरलेले आहे. अहिंदूंचे हे धार्मिक वास्तव लक्षात घेऊन खरेतर भारतातील हिंदूंनी अत्याभिमानाने स्वधर्माचे अनुसरण करायला हवे; मात्र भारतात हिंदूंचा त्यांच्या स्वधर्माचा अभ्यास नसल्याने लक्षावधी हिंदू प्रतिवर्षी अहिंदूंच्या मायावी बोलण्याला भुलून धर्मांतर करत आहेत. हे कुठेतरी थांबायला हवे. हिंदूंची पुढील पिढी अहिंदु होऊ नये, यासाठी हा ग्रंथ वाचून हिंदूंवरील धर्मांतराचे आक्रमण हिंदूंनी परतवून लावावे, हीच ईश्वरचरणी प्रार्थना !